POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३०८ ● मुंबई, सोमवार, ०९ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## कोकणात राणे बंधूंमध्ये शाब्दिक युद्ध पेटले

# नितेश राणे म्हणाले, निलेश राणे, तुम्ही 'टॅक्स फ्री'

**नितेश राणे नेमकं काय म्हणाले होते?**

सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीर्चाच मुख्यमंत्री बसलाय सगळ्यांनी लक्षात ठेवा, अशी धमकीच त्यांनी स्थानिक शिवसेना नेत्यांना दिली आहे. कुणी कितीही ताकद दाखवली , कोणीही कसेही नाचले तरी देशात भाजपचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असल्याचं लक्षात ठेवा, असेही नितेश राणे म्हणाले होते.



**■मुंबई । प्रतिनिधी :**

कोकणात भाजपचे राणे विरूद्ध शिवसेनेचे राणे असा संघर्ष पेटलाय की काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. शिवसेनेचे कुडाळचे आमदार निलेश राणे आणि त्यांचे सख्खे भाऊ असलेले मंत्री आणि भाजपचे नेते नितेश राणे यांचं शाब्दिक युद्ध रंगलंय. नितेश यांनी जपून बोलावं, आपण सभेत बोलल्याने नेमका कोणाचा फायदा करतोय याचं भान असावं अशी समज आमदार निलेश राणे यांनी आपल्या भावाला दिली आहे. धाराशिवमध्ये जाहीर सभेत नितेश राणे यांनी केलेल्या वक्तव्यानंतर निलेश राणेंनी एक्स पोस्टच्या माध्यमातून ही समज दिली.

नितेशने जपून बोलावे...मी भेटल्यावर बोलेननच पण आपण बोलताना सगळ्या गोष्टींचं भान ठेवून बोललं पाहिजे. सभेत बोलणं सोपं आहे पण आपल्या बोलण्यामुळे आपण नेमकं कोणाचा फायदा करतोय याचं भान असलं पाहिजे. आपण महायुतीमध्ये आहोत हे विसरून चालणार नाही, असं निलेश राणे एक्सवर पोस्ट करत म्हणाले. निलेश राणेंनी समज दिल्यावर मंत्री नितेश राणेंनीही एक्सवरून उत्तर दिलंय. तुम्ही टॅक्स फ्री आहात, असं उत्तर नितेश राणेंनी दिलं.

**भाजप आणि शिवसेनेत जिल्हा नियोजन समिती निधीवरून सुप्त संघर्ष–**

राणे बंधूंमधला हा पक्षीय संघर्ष पेटलाय तो धाराशिव जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगितीवरून...कुणी कितीही ताकद दाखवली, कसेही नाचले तरी सगळ्यांचा बाप म्हणून भाजपचा मुख्यमंत्री बसलाय हे लक्षात ठेवा असं वक्तव्य नितेश राणेंनी मित्रपक्ष शिवसेनेला दिलं. शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक हे धाराशिवचे पालकमंत्री आहेत. भाजपच्या राणा जगजीतसिंह पाटील यांच्या तक्रारीनंतर प्रताप सरनाईकांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देण्यात आलीय. तिथे भाजप आणि शिवसेनेत जिल्हा नियोजन समिती निधीवरून सुप्त संघर्ष सुरू आहे. त्यावरून नितेश राणेंनी शिवसेनेला उद्देशून बोचरी टीका केली होती.

## राज-उद्धव एकत्र येण्याबाबत काय चर्चा? किशोरी पेडणेकरांनी दिली माहिती

राज्याच्या राजकारणात आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरती राजकीय वातावरण चांगलचं तापल्याचं चित्र आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्रिकरणाची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. यादरम्यान आज ठाकरेंच्या शिवसेनेची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये युतीबाबत कोणती चर्चा झाली का? याबाबत ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी भाष्य केलं आहे. राज्यात सुरू असलेल्या मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या एकत्रिकरणाबाबत काही चर्चा झाली का? याबाबतच्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना किशोरी पेडणेकर म्हणाल्या, अजिबात या मुद्यावर कोणतीही चर्चा झाली नाही. फक्त नागरिकांच्या मुद्यावर बोलले.

**नितेश राणेंना किशोरी पेडणेकरांचा सल्ला**

नितेश राणेंच्या "सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीर्चाच मुख्यमंत्री बसलाय, हे लक्षात ठेवा." त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली असून विरोधकांनी त्यांच्यावर टीकेचा जोरदार भडिमार केला आहे. श्कोणी कितीही ताकद दाखवली, कोणीही कसेही नाचले तरी देशात नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान आणि राज्यात देवेंद्र फडणवीस हेच खरे मुख्यमंत्री आहेत. "मंत्रीपदावर असलेल्या व्यक्तीकडून सातत्याने सामाजिक तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याने विरोधक त्यांच्यावर टीकास्त्र सोडत आहेत. या साऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर नितेश राणे यांचे बंधू निलेश राणे यांनीही प्रतिक्रिया दिली असून, श्नितेशने जपून बोलावे," असा सूचक सल्ला त्यांनी दिला आहे. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पेडणेकर म्हणाल्या, नितेश राणे यांनी खरंच सांभाळून बोलले पाहीजे. सत्तेत घेतलेले मांडीवर बसविलेले जे पक्ष आहे त्यांच्याबाबत तरी असे बोलू नका. आम्ही विरोधी पक्ष त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देत नाही. पण किमान सोबत घेतलेल्या लोकांबद्दल तर बोलू नका? असंही पुढे किशोरी पेडणेकरांनी म्हटलं आहे.

## मद्यधुंद पोलीस कर्मचाऱ्याची भर चौकात इसमाला मारहाण

# व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल, पोलीस निलंबित

**■गोंदिया । प्रतिनिधी :**

गोंदिया जिल्ह्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात चक्क पोलीस कर्मचाऱ्याने छत्तीसगढ राज्यातील एका इसमाला बेदम मारहाण केल्याची घटना गोंदिया जिल्ह्यात उघडकीस आली आहे. गोंदिया जिल्ह्यातील डूग्गीपार पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेला कांचन राहुले हा पोलीस कर्मचारी रस्त्याने जात असताना छत्तीसगड राज्यातील सुनीतकुमार मडावी याने कट मारून ओव्हरटेक केल्याच्या आरोप केलाय.

**पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह**

दरम्यान, याच कारणावरून पोलीस कर्मचारी कांचन राहुले याने सुनीतकुमार मडावीला जबर मारहाण केली. ही घटना १९ मे २०२५ रोजी घडली. त्यानंतर सुनीतकुमार मडावी याने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. यावर गोंदिया पोलिसांनी संबंधित पोलिसावर कारवाईचा बडगा उगारत निलंबित केलं असून सदर पोलीस कर्मचारी



मद्यधुंद अवस्थेत असल्याची माहिती देखील पोलिसांच्या तपासात समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात येत आहेत.

**पोलीस कर्मचाऱ्याला नोकरीतून बडतर्फ करावं– सुनीतकुमार मडावी**

तर दुसरीकडे, पोलीस कर्मचाऱ्याने मला चुकीच्या पद्धतीने मारहाण केली आणि आता हा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्यामुळे माझी प्रतिष्ठा समाजामध्ये मलीन झाल्याचा आरोप करीत संबंधित कर्मचाऱ्याला नोकरीतून बडतर्फ करावं, अशी मागणी सुनीतकुमार मडावी याने पोलीस विभागाकडे केली आहे.

दरम्यान दोन दिवसापूर्वी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झाडावर चढत या संस्थांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी अशी मागणी करण्यासाठी आंदोलन केले होते.

**मठाचे अध्यक्ष व सचिव यांनी जीवे मारण्याची धमकी**

बीडच्या केज तालुक्यातील सासुरा येथे असलेल्या संत एकनाथ महाराज मठ संस्थानच्या वादातून उत्तरअधिकारी असलेल्या केशव महाराज शास्त्री यांना या मठाचे अध्यक्ष व सचिव यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. केशव महाराज शास्त्री यांनी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते. हे उपोषण केल्याचा राग मनात धरून संस्थानचे अध्यक्ष रतन महाराज मुंडे,सुसेन भोसले, राजेन भोसले तसेच ज्ञानेश्वर भोसले यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार केशव महाराज शास्त्री यांनी दिली होती त्यावरून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पावसाबाबत महत्त्वाची माहिती

**■मुंबई । प्रतिनिधी :**

भारतीय हवामान विभागाने आता देशाच्या बहुतेक भागात मान्सूनला उशीर का होत आहे याबद्दल एक नवीन अपडेट दिली आहे. हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात कोणतीही प्रणाली तयार होत नाहीये, ज्यामुळे मान्सूनला उशीर होत आहे. मान्सूनला उशीर झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीवर परिणाम दिसून येत आहे.

**मान्सून कधी येणार?**

भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे की नैऋत्य मान्सून १२ ते १८ जून दरम्यान सुरू होऊ शकतो. आयएमडीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की १२-१३ जून रोजी बंगालच्या उपसागरात एक प्रणाली तयार होऊ शकते. तथापि, वेगवेगळ्या मॉडेल्समुळे अजूनही काही अनिश्चितता आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, काही मॉडेल्स सिस्टम तयार करण्याबद्दल बोलत आहेत, तर काही नाहीत.



आयएमडी अधिकाऱ्याच्या मते, पश्चिमेकडील वारे बळकट झाल्यामुळे आणि पश्चिम किनाऱ्यावर ऑफ-शोअर ट्रफ तयार होण्याची शक्यता असल्याने दक्षिण द्वीपकल्पीय आणि लगतच्या मध्य भारतातील अनेक भागात व्यापक ते अतिशय व्यापक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मान्सून पुन्हा सुरू झाल्यानंतर मध्य भारत, महाराष्ट्राच्या काही भागात आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात (जिथे मान्सून आधीच पोहोचला आहे) चांगला पाऊस पडण्याची अपेक्षा आयएमडीला आहे. आयएमडी म्हणते की मान्सूनच्या प्रगतीसाठी पावसाचे वितरण खूप महत्वाचे आहे. मान्सूनच्या मंद हालचालीमुळे दुष्काळाचा सामना करणाऱ्या भागांसाठी या अंदाजामुळे आशेचा किरण आला आहे.

आयएमडी अधिकाऱ्याच्या मते, पश्चिमेकडील वारे बळकट झाल्यामुळे आणि पश्चिम किनाऱ्यावर ऑफ-शोअर ट्रफ तयार होण्याची शक्यता असल्याने दक्षिण द्वीपकल्पीय आणि लगतच्या मध्य भारतातील अनेक भागात व्यापक ते अत्यंत व्यापक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# पुरातत्व खात्याची नोटीस, रायगडवरील कुटुंब बेघर

**■रायगड । प्रतिनिधी :**

पिढ्यानपिढ्या किल्ले रायगडावर राहणाऱ्या धनगर कुटुंबांना गड सोडण्यासाठी केंद्रीय पुरातत्व विभागाने तगादा लावला आहे. आता या वस्तीतील नागरिकांना गड सोडण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. ही कुटुंब या ठिकाणी येणाऱ्या शिवप्रेमी, पर्यटकांना ताक, दही, चहा, नाश्ता पुरवून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. गड सोडता आम्हाला घरं नाहीत. आम्ही जायचं कुठं आमच्या मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे असं म्हणणं त्या कुटुंबाचं आहे.

किल्ले रायगडावरील धनगर समाजाच्या वस्तीत बहुतांश कुटुंब रायगडावर येणा-या शिवप्रेमींना नास्ता, जेवण पुरवून आपला उदरनिर्वाह चालवतात. मात्र, याच वस्तीतील नागरिकांवर आता बेघर होण्याची वेळ आली आहे.





ही धनगर समाजाच्या वस्तीतील नागरिकांना गड सोडण्यासाठी केंद्रीय पुरातत्व विभागानं नोटीसा बजावल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यापुढे मोठं संकट उभं ठाकलंय. पिढ्यानपिढ्या रायगडावर राहणाऱ्या धनगर समाजाच्या वस्तीतील नागरिकांनी गड सोडल्यास आम्ही जायचं कुठं, असा सवाल उपस्थित करत गड खाली करण्यास नकार दिला आहे.

गड सोडण्यासाठी केंद्रीय पुरातत्व विभागानं दिलेल्या नोटीसांमुळे ही कुटंब भयभीत झाली आहेत. आता पावसाळा सुरु असताना जायचं कुठं असा प्रश्न या वस्तीतील नागरिकांसमोर आ वासून उभा ठाकलाय. इथल्या नागरिकांना रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावलेंसह छत्रपती संभाजीराजेंनी धीर दिला आहे.

झोपडीवजा असलेल्या रायगडावरील धनगर समाजाच्या वस्ती उठवण्यासाठी यापूर्वीदेखील नोटीसा बजावण्यात आल्या होत्या, मात्र, स्थानिक नागरिकांसह शिवप्रेमी संघटनांनी त्यांना विरोध केला होता. आता पुन्हा केंद्रीय पुरातत्व विभागानं नोटीसा बजावल्यानं इथल्या वस्तीतील नागरीक मोठ्या संकटात सापडलेत.

# रत्नागिरीमध्ये मिनी बस आणि एलपीजी गॅस सिलिंडर वाहणाऱ्या टॅंकरचा झाला भयंकर अपघात



अपघात इतका भीषण होता की टॅंकर आणि ट्रॅव्हल्स यांना धक्का लागल्यानंतर काही क्षणातच आग भडकली. या आगीचा विळखा आसपासच्या घरांना, गुरांच्या गोठ्याला आणि उभ्या असलेल्या वाहनांनाही बसला. दोन दुभती जनावरे या आगीत जखमी झाली असून एक रिक्षा पूर्णपणे जळून खाक झाली आहे. घरावरील फायबर पत्रेही पेटले. जखमींवर रत्नागिरी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू या घटनेत सुमारे २० ते २५ नागरिक जखमी झाले असून, त्यांना तातडीने रत्नागिरी सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली आहे.

**■रत्नागिरी । प्रतिनिधी :**

रत्नागिरी जिल्ह्यातील बावंडी गावाजवळ शनिवारी सकाळी खासगी मिनी ट्रॅव्हल्स आणि सीएनजी टॅंकर यांच्यात भीषण अपघात झाला. ज्यात घरं, गुरांचा गोठा आणि वाहने जळून खाक झाली. रत्नागिरी जिल्ह्यातील बावनदी येथे सकाळी खासगी मिनी ट्रॅव्हल्स आणि सीएनजी टॅंकर यांच्यात भीषण अपघात झाला. या आगीत घरं, गुरांचा गोठा आणि वाहने जळून खाक झाली असून, २५ जणांहून अधिक लोक जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, महसूल विभाग, अग्निशमन दल आणि इतर शासकीय यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. टॅंकरमधून सुरू असलेली सीएनजी गळती तातडीने थांबवण्यात प्रशासनाला यश आलं आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी दमदार प्रयत्न सुरू आहेत.

# पुण्यातील तिहेरी हत्याकांडाचे गूढ अखेर समोर

## नवऱ्यासोबत वाद, बहिणीच्याच दिरासोबत शारिरीक संबंध अन्...

**■पुणे । प्रतिनिधी :**

पुण्यातील रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील तिहेरी हत्याकांड प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. १० दिवसांपूर्वी जळालेल्या अवस्थेत तीन मृतदेह सापडले होते. त्याचे गूढ अखेर उकलण्यात यश आले आहे. पोलिसांनी मृत अज्ञात महिलेची आणि तिच्या दोन चिमुकल्या मुलांची ओळख पटवण्यात यश आलं आहे. गोरख बोखारे असं अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. अनैतिक संबंधातून ही हत्या करण्यात आल्याचे समोर येत आहे.

मृत स्वाती ही आरोपी गोरखच्या चुलक मामाची मुलगी होती. स्वाती आणि तिच्या

पोलिसांनी आरोपीला अटक केली असून अनैतिक संबंधातूनच हे तिहेरी हत्याकांड घडल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मृत महिलेच्या नातेवाईकानेच हे तिनही खून केल्याचे उघड झाले आहे. २५ मे रोजी खंडाळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक महिला आणि दोन मुलांचे मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडले होते. स्वाती केशव सोनवणे (२५), स्वराज (३) आणि विराज (१ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत. आरोपीने महिलेची आणि दोन मुलांची हत्या करून पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेहांवर पेट्रोल टाकून पेटवून दिले होते.



नवऱ्यामध्ये कायम भांडणे होत होती. त्यांचे वाद नेहमी गोरख सोडवत होता. त्यातूनच त्याचे आणि स्वातीचे प्रेमसंबंध जुळले. स्वातीने सतत गोरखकडे लग्नाचा तगादा लावला होता. एकदिवस आरोपीने मोटरसायकलवर स्वाती सोनवणे व तिच्या दोन्ही मुलाना आळंदीतून घेऊन सरहद वाडी शिरूर येथे घेऊन आला. तिथे त्याने स्वातीसोबत शरीरसंबंध ठेवले. त्यानंतर पुन्हा त्यांच्यात वाद झाले. दोन्ही मुलं झोपेत असताना गोरखने स्वातीचा गळा आवळून खून केला. तसंच, दोन्ही मुलांचाही जीव घेतला.

मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून तिघांच्याही मृतदेहावर पेट्रोल टाकून पेटवून दिले. नंतर त्याने घटनास्थळावरून पळ काढला. यानंतर तो नेहमी प्रमाणे रांजणगाव येथील एका कंपनीमध्ये गाडीवर चालक म्हणून काम करत राहिला. मृतदेहाची ओळख पटवणे हे पोलिसांसाठी आव्हानात्मक काम होते. पुणे ग्रामीण पोलिसांनी महिलेच्या हातावर असलेल्या टॅटूच्या आधारे मृतदेहाची ओळख पटवली आणि आरोपीचा शोध घेतला. आरोपी हा मृत महिलेच्या बहिणीचा दीर आहे.

# कोल्हापूरात मित्रानेच मित्राला संपवलं!


## प्रेयसीसोबतचे फोटो मोबाईलवर पाठवायचा अन्...

**■कोल्हापूर । प्रतिनिधी :**

पहिलीपासून एकत्र असणाऱ्या एक मित्राने दुसऱ्या मित्राचा कड्यावरून ढकलून खून केल्याच्या घटनेनं कोल्हापूर हादरून गेलं आहे. जिल्ह्यातील केर्ले गावात ही घटना घडली आहे. या दोघाही मित्रांचा एकाच मुलीवर प्रेम जडल्याने लव्ह ट्रँगलमधून महेंद्र कुंभार या तरुणाची हत्या करण्यात आली आहे.

**शोधाशोध केली पण...**

शोधाशोध केला असता गावातील मोहिते खाणीजवळ शंभर फूट खोल खाणीत महेंद्र कुंभार याचा मृतदेह आढळून आला. याप्रकरणी करवीर पोलिसांनी तपास केला असता महेंद्र कुंभार रात्री आठ वाजता घरातून बाहेर जाण्यापूर्वी त्याला जिवलग मित्राचा फोन आल्याचं समोर आलं. पोलिसांनी मित्राची कसून चौकशी केल्यानंतर आपल्या मित्राला आपणच संपवल्याचं आरोपीने पोलिसांना सांगितले. महेंद्र कुंभार हा एका मुली सोबत बोलत होता. त्या दोघांमध्ये प्रेम संबंध होते पण संशयित अल्पवयीन मुलाचेही त्याच मुलीवर एकतर्फी प्रेम होते. काही वेळा महेंद्र त्यामुली सोबतचे फोटो अल्पवयीन मित्राला पाठवायचा अन् त्यांच्या प्रेमसंबंधांबद्दल आरोपी मित्राची गप्पा मारायाचा. याचा राग मनात ठेवून अल्पवयीन मित्राने महिंद्रचा काटा काढण्याचं निश्चित करून शंभर फुटावरून ढकलून त्याची हत्या केल्याचं समोर आलं आहे.





**शंभर फुटावरून ढकलून दिलं**

खरं तर पहिलीपासून एकत्र असलेल्या या दोघांच्या मैत्रीची अख्या केर्ले गावात चर्चा होती. महेंद्र कुंभार आणि अल्पवयीन मित्राची घानिष्ठ मैत्री गावभर सर्व परिचित होती. हे दोघेही मित्र बारावीची परीक्षा देखील एकत्रच उत्तीर्ण झाले. मात्र या दोघांचे एकाच मुलीवर प्रेम जडले आणि त्यानंतर एकतर्फी प्रेमातून मुलगी आपल्याला किंमत देत नसल्याच्या रागातून जिवलग मित्राला शंभर फुटावरून ढकलून त्याची हत्या केली. केर्ले गावातील महेंद्र कुंभार रात्री अकराच्या सुमारास घरातून बेपत्ता झाला. त्यानंतर त्याचा शोध सुरु झाला.

**कोणी मदत केली?**

महिंद्र आणि त्याचा अल्पवयीन संशयित मित्र पहिलीपासून एकाच वर्गात होते. दोघे एकाच बाकावर बसत होते. त्यांची मैत्री घट्ट होती.. पण दोघांचेही एकाच मुलीवर प्रेम जडल्याने एका मित्राने आपला १८ वर्षीय महेंद्र कुंभार याचा खून केला. या घटनेमुळे प्रेमाच्या त्रिकुटातून खून झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. पोलिसांनी सध्या अल्पवयीन मित्राला ताब्यात घेऊन अधिक चौकशी सुरू केली आहे. पण या अल्पवयीन मित्राला महेंद्र कुंभारचा खून करण्यासाठी कोणी मदत केली का? याचा तपास पोलीस अधिक करत आहेत. महेंद्रचा खून झाल्यानंतर महेंद्रबाबत अल्पवयीन मित्राने घरात येऊन साधी चौकशी देखील केली नाही. त्यातूनच या खुनाचा उलगडा झाला, असं पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांनी सांगितलं.

# १० महिन्यांचा चिमुकला खेळता खेळता...

**■नाशिक । प्रतिनिधी :**

नाशिक जिल्ह्यात एक हृदयद्रावक प्रकार समोर आला आहे. दहा महिन्यांच्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकाराने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. धक्कादायक म्हणजे दहा महिन्यांचा चिमुकला खेळता खेळता पाण्याच्या बादलीत पडल्याने त्याची प्राणज्योत मालवली.

नाशिकमधील देवळालीगाव येथील रोकडोबावाडी येथील मशिदीजवळील रहिवासी अजय तायडे यांचा दहा महिन्यांचा मुलगा रोशन हा बुधवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घरात खेळत होता. बाळ खेळत असल्याचे समजून त्याची आईदेखील स्वयंपाकघरात गुंतली होती. मात्र काही वेळाने रोशनचा काहीच आवाज नाही म्हणून त्या स्वयंपाकघरातून बाहेर आल्या. मात्र घरात कुठेच तो आढळून आला



नाही. तेव्हा रोशनची शोधाशोध सुरू झाली.

रोशन घरात खेळत असताना तो पाण्याने भरलेल्या बादलीजवळ गेला. खेळता-खेळता तो बादलीत पडला अन् नाकातोंडात पाणी गेल्याने त्याचा गुदमरल्यामुळं जीव गेला. रोशन कुठेच सापडत नाही म्हणून घरच्यांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. मात्र नंतर तो कुटुंबीयांना पाण्याच्या बादलीत पडलेला आढळून आला. त्यानंतर त्याच्या आजोबांनी त्याला बिटको रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तसंच, मुलांवर डोळ्यांत तेल घालून लक्ष देण्याची गरज असल्याचेही समोर आले आहे. १० वर्षांच्या चिमुकल्याच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबीयांवर आभाळ कोसळले आहे. आई-वडिलांना मोठा धक्का बसला आहे.

**संभाजीनगरमध्ये खळबळ**

नाशिकप्रमाणेच संभाजीनगरमध्येही अशीच एक घटना समोर आली आहे. घराजवळ खेळत असलेल्या दीड वर्षीय चिमुकल्यावरून आई-वडिलांची नजर हटली आणि चिमुकल्याचा घरा पाठीमागील शोष खड्ड्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मन हेलावून टाकणारी घटना छत्रपती संभाजीनगरच्या पाचोडमध्ये घडली आहे. घराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या शोष खड्ड्यातील पाण्यात बुडून एका दीड वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. तैमूर तश्कील मोमीन असे मृत बालकाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आता प्रतीक्षा कॉलेज प्रवेशाची!

अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. गुरूवारपर्यंत एकूण १२ लाख ७१ हजार २९५ विद्यार्थ्यांनी अकरावीच्या प्रवेशासाठी अधिकृतरित्या नोंदणी केल्याची आकडेवारी समोर आली आहे. राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा पहिल्यांदाच सर्वच्या सर्व ९ विभागीय मंडळात केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे अकरावी प्रवेशाची प्रक्रिया राबवली. नाही म्हटले तरी, याआधी मुंबई-पुण्यासह काही विभागांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा अनुभव मंडळाच्या पाठीशी होताच. त्या अनुभवाच्या आधारे राज्यभरात अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवताना ती अत्यंत सुरळीतपणे होईल, अशी अपेक्षा होती. परंतु हा पहिलावहिला अनुभव विद्यार्थी-पालक आणि शाळांसाठी मोठा तापदायकच ठरला. कुठलीही रेल्वेगाडी जेव्हा एक ट्रॅक बदलून दुसऱ्या ट्रॅकवर जाते, तेव्हा खडखडाट होणार हे आपण गृहीत धरलेलेच असते. त्यानुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत थोडाफार गोंधळ उडण्याची शक्यता होतीच. परंतु पहिल्या वर्षी झालेला सावळागोंधळ विद्यार्थी-पालक आणि शाळांसाठीही अक्षरशः असह्य ठरला. अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थी-पालकांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून बहुतांश शाळांनी ही जबाबदारी आपल्याच खांद्यावर घेतली होती. त्यानुसार शाळेतून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरले जात होते. प्रत्येक शाळेत विशेष व्यवस्था करण्यात आली होती. ऑनलाईनचे ज्ञान असलेल्या तज्ञ शिक्षकांना याकामी बसवण्यात आले होते. ते विद्यार्थी-पालकांकडून माहिती घेत अर्ज नोंदणीचे काम करत होते. परंतु ऑनलाईन अर्ज नोंदणीच्या पहिल्याच दिवशी या प्रक्रियेचा फज्जा उडाला. एकाच वेळी मोठ्या संख्येने अर्ज नोंदणीचा प्रयत्न झाल्याने ऑनलाईन प्रवेशाचे संकेतस्थळ क्रॅश झाले. दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीही हीच स्थिती राहिली. नाईलाजास्तव तांत्रिक दुरुस्तीच्या कामासाठी मंडळाला चार दिवसांचा विराम घोषित करावा लागला. त्यानंतर नव्याने वेळापत्रकाची घोषणा करून पुन्हा प्रवेश प्रक्रिया सुरू करावी लागली. तरीही शिक्षण विभागाच्या सॉफ्टवेअर प्रणालीत तांत्रिक त्रुटी येतच राहिल्या. यावर्षी राज्य माध्यमिक मंडळाची दहावीची परीक्षा दिलेले १५ लाखांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये सीबीएससी आणि आयसीएससीच्या आणखी काही विद्यार्थ्यांची संख्या गृहीत धरली तरी ती २० लाखांच्या जवळपास जाते. या तुलनेत राज्यातील कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळांची पहिल्या फेरीमध्ये ९,४३५ नोंदणी करण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता २१,२३,०४० इतकी आहे. आता लाखोंच्या संख्येने विद्यार्थ्यांची अर्ज नोंदणी होणार असेल, तर त्याचा भार हा संकेतस्थळावर येणे स्वाभाविकच आहे. त्याची तयारी मंडळाने आधीच करायला हवी होती. सॉफ्टवेअर, बॅकअप आणि त्यातही सर्वात महत्त्वाचे म्हणजे एवढा भार सहन करू शकेल, अशा सर्व्हरची व्यवस्था व्हायला हवी होती. परंतु ज्याअर्थी पहिल्याच दिवशी संकेतस्थळ क्रॅश झाले, त्यावरून तरी अशी कुठलीही पूर्वतयारी राज्य मंडळाने केली नसल्याचे दिसून आले. तयारी केली असेल, तरी त्यात असंख्य त्रुटी राहिल्या. एवढे कमी की काय ऑनलाईन प्रक्रिया पुन्हा सुरू झाल्यावरही लॉग इन, नाव नोंदणी, पत्ता व इतर तपशील भरणे, अर्ज भरणे, महाविद्यालयाचा पसंतीक्रम भरणे, नोंदणी शुल्क भरणे आदी वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये नोंदणी करताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. प्रवेश प्रक्रियेचे अग्निदिव्य पार पाडताना हजारो विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसला. माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने ती समस्या दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यातून ४ जून रात्री उशिरापर्यंत सर्व प्रलंबित ९०० तक्रारी सोडवण्यात आल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले. दरम्यानच्या काळात वैतागलेल्या पालकांनी ऑनलाईन नोंदणीऐवजी पुन्हा ऑफलाईन नोंदणीची मागणीही शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना भेटून केली. अर्थात प्रवेश प्रक्रियेच्या मध्यावर तसे करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याने पालकांच्या मागणीकडे रितसर दुर्लक्ष करण्यात आले. परंतु पालकांची मागणी काहीही चुकीची नव्हती हे मंडळाने ध्यानात घेतले पाहिजे. अकरावीचा टप्पा हा कुठल्याही स्तरातील विद्यार्थी-पालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. या टप्प्यातच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करिअरला नवे वळण मिळत असते. त्याच टप्प्यात विद्यार्थ्यांच्या करिअरशी हेळसांड होणार असेल तर ते कुणीही खपवून घेऊ शकत नाही. विद्यार्थ्यांचे पालक तर नाहीच नाही. नियोजित वेळापत्रकानुसार शून्य फेरी गुणवत्ता यादी ८ जून २०२५ रोजी जाहीर होणार असून ९ जून ते ११ जून २०२५ या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष प्रवेश होतील. तसेच कॅप फेरीची गुणवत्ता यादी १० जून २०२५ रोजी जाहीर होणार असून ११ जून ते १८ जून २०२५ या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष प्रवेश होतील. त्यामुळे नोंदणीनंतर आता आपल्याला कुठल्या महाविद्यालयात प्रवेश मिळणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागणार आहे. ऑनलाईनच्या नावाखाली शिक्षण मंडळाने कशीबशी वेळ मारून नेली, परंतु पुढच्या वर्षी हा गोंधळ टाळायचा असेल तर मंडळाने आधीच सर्व तांत्रिक बाजू तपासून त्रुटी दूर करायला हव्यात. ऑनलाईनपेक्षा ऑफलाईनचा गोंधळच बरा होता हे म्हणण्याची वेळी पुन्हा विद्यार्थी-पालकांवर येऊ नये.

# विवाहाच्या आचारसंहितेचे पालन व्हावे!

**समाजात भपकेबाज लग्न आणि हुंडापद्धतीमुळे निष्पाप विवाहितांचे हुंडाबळी जाऊ लागलेत. वाढत्या हुंडाबळीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आता समाजातील धुरिणांनी हुंडा पद्धतीला लगाम घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी आचारसंहिता लागू करावी अशी सूचना समोर आली आहे. त्यादृष्टीने त्यांनी जाहीर केलेल्या आचारसंहितेत लग्नात नवरीकडून हुंडा घेऊ नका. मुलामुलीच्या लग्नासाठी कर्ज काढू नका. प्री वेडिंग बंद करा. मुलीच्या नावे मुदत ठेव करा. साखरपुडा, हळदी, लग्न एकाच दिवशी करा, अशा सूचना आहेत. त्यांचा लोकांनी स्वीकार करावा ही अपेक्षा.**



राज्यात वैष्णवी हगवणे यांच्या आत्महत्येनंतर मोठ्या प्रमाणावर लग्नावरील उधळपट्टी, हुंडा यावर चर्चा सुरू झाली. राज्यात हुंडा प्रतिबंधक कायदा असूनही हुंड्याची देवाणघेवाण होत आहे. त्याची कदाचित सार्वजनिक स्वरूपात चर्चा होत नसेल, मात्र हुंडा दिला जातो आणि घेतला जातो यावर शिक्कामोर्तब झाले आहे. कधीकाळी रेडिओ, भांडे, सायकल, अर्धा एक तोळ्याची अंगठी घेतली जात होती, मात्र आता हुंड्याच्या रकमेचे आकडे, सोन्याचे तोळे, महागड्या गाड्या, फ्लॅट यासारख्या गोष्टी आता हुंड्यात दिल्या जाऊ लागल्या आहेत. दिल्या जात नाही तर मागितल्या जात आहेत. आर्थिक श्रीमंतीचा स्तर उंचावतो आहे आणि त्याप्रमाणात हुंड्याचे आकडे उंचावत आहेत इतकंच. मात्र हुंडा घेण्याबरोबर लग्नदेखील मोठ्या प्रतिष्ठेच्या मार्गाने करावे लागत आहे. त्यासाठी लाखो रुपये खर्च होत आहेत.

माणसांचे माणसांसोबतचे असणारे नाते हरवत चालले आहे. माणसांना प्रेमाची भूक लागण्याऐवजी पैसा, संपत्ती आणि प्रतिष्ठेची भूक लागली आहे. या भूकेतून आत्महत्या, हत्या, छळ होताना दिसतो आहे. अशा पार्श्वभूमीवर राज्यात मराठा समाजातील धुरिणांनी पुढे येत मराठा समाजातील मुलामुलींची लग्ने करताना काही नियम पाळावेत म्हणून आचारसंहिता जारी केली आहे. या आचारसंहितेचे पालन झाले तर महाराष्ट्राचे सामाजिक चित्र पालटलेले अनुभवता येईल. ती वाट उद्यासाठी अधिक प्रकाशमय असेल म्हणून केवळ मराठा समाजाने नाही, तर अवघ्या महाराष्ट्रातील सर्व जाती, धर्माच्या लोकांनी या दिशेने प्रवास करण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे.

मराठा समाजाच्या कर्त्या लोकांनी एकत्रित येऊन समाजात जे काही घडते आहे, ज्या चुकीच्या पाऊलवाटा निर्माण होत आहेत त्याबद्दल चिंतन करत, समाजाला वाईट परंपरेतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी खरंतर त्या कर्त्या लोकांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. हे घडत असताना सामान्य लोकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यामुळे समाजमनात परिवर्तनाचा विचार होताच, मात्र सामान्यांना आवाज नसतो. त्यामुळे समाजातील कर्त्या लोकांनी भूमिका घेतली की, सामान्य माणसं चांगल्याच्या मागे उभे राहतात हा सामाजिक अनुभव आहे.

मुळात सामान्य माणसांच्या शहाणपणावर नेहमीच विश्वास ठेवावा इतके शहाणपण त्यांच्याकडे निश्चित असते. या निमित्ताने मराठा समाजाच्याच नव्हे तर समाजातील विविध जाती, धर्मात केल्या जाणाऱ्या विवाह सोहळ्यावर लाखो रुपयांची उधळपट्टी केली जात आहे. हे सारे दुर्दैवाने उघड्या डोळ्यांनी पाहिले जात आहे. त्यावर सरकार काही बोलत नाही. राज्यकर्त्यांची हाताची घडी तोंडावर बोट अशी भूमिका आहे. उलट समाजातील एक वर्ग आपल्या कुटुंबातील विवाह सोहळे अधिक देखणे व्हावेत म्हणून अधिकाधिक प्रयत्न करत आहेत. त्यासाठी लाखो रुपये उधळले जात आहेत. यातून संपत्तीचे ओंगळवाणे दर्शन घडवते आहे. त्यासंदर्भाने आचारसंहिता जाहीर करताना या उधळपट्टीवर लगाम घालण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

वैष्णवी हगवणेंच्या हुंडाबळीनंतर समाजातील लग्नसमारंभाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. समाजात गेल्या काही वर्षांत लग्नात प्रचंड उधळपट्टी केली जाते. अर्थात काहीजण श्रीमंती दाखवण्याठी हे सारे करत आहेत. लग्न हा एक कौटुंबिक आणि धार्मिक विधी आहे. तो संस्कार म्हणूनच पुढे घेऊन जाण्याची गरज आहे. त्याचवेळी विवाह सोहळ्याच्या निमित्ताने परिवर्तनाची गरज आहेच, मात्र हे परिवर्तन विवेकी असायला हवे, दुर्दैवाने हे परिवर्तन चुकीच्या दिशेनेच घडते आहे. गेली काही वर्षे प्री वेडिंग शूट, डेस्टिनेशन वेडिंग, रिसॉर्ट वेडिंग, थीम वेडिंग, संगीत अशा आपल्या विवाह संस्कारात नसलेल्या अनेक गोष्टींचा समावेश केला आहे. या गोष्टींचा संस्काराशी, मूल्यांशी, भविष्याशी काही तरी संबंध आहे का? याचा विचार करण्याची गरज आहे. यासाठी मुलीच्या आईबाबांना लाखो रुपये खर्च करावे लागत आहेत. जवळच्या एकाने केले म्हणून इतरही त्यामार्गाने जातात.

अनुकरणाची वाट चालत असताना खरंच ते अनुकरणाने कुटुंबाचे, समाजाचे काही भले होणार आहे का? याचा विचार न करता केवळ चित्रपटासारखे प्रदर्शन करण्यात लोकांना आनंद वाटतो आहे. मात्र हे सारे करताना त्याचे सादरीकरण लग्न सोहळ्यात केले जाते. खरंतर यातील अनेक शूट ओंगळवाणे असतात आणि ते पाहणेदेखील नकोसे होते, तरीही ते लग्नात जमलेल्या गर्दीसमोर सादर केले जातात. आता नव्याने घोषित केलेल्या आचारसंहितेत असे करू नये आणि केले तर किमान दाखवू नये, असा विचार पुढे आला आहे. त्यामुळे आपले व्यक्तिगत जीवन दर्शनीय असावे. ते प्रदर्शनीय होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. हा सारा प्रवास घडत असताना आपण लाखो रुपयाची उधळपट्टी करत असतो. यातून नेमके काय साध्य होते याचा विचार करायला हवा. मुळात ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे ते लोक हे करतात, मात्र काहीजण ऐपत नसतानाही समाजाला दाखवता यावे यासाठी हा सगळा मार्ग अनुसरतात. काही वेळा तर यासाठी मुलीकडील मंडळींकडून पैसे उकळले जातात.

लग्नाच्या निमित्ताने महानगरे आणि शहरे यांची तुलना केली तर हा खर्च न परवडणारा आहे. समाजाकडून प्रतिष्ठा मिळावी म्हणून परिस्थिती नसतानादेखील ही वाट चालावी लागते. पैसे नसले तर भ्रष्टाचाराचा मार्ग अनुसरला जातो. शेवटी एखादी मध्यमवर्गीय व्यक्ती हे सारे करू शकेल असे नाही, मात्र सामाजिक दबाव असतो. माणसं खोट्या प्रतिष्ठेच्या मागे धावत असतात. सध्या आपल्या राज्यातील महानगरे आणि ग्रामीण भागातील लग्न सोहळ्यातील विविध खर्चावर नजर टाकली, तर तोंडात बोट घालावे अशी परिस्थिती आहे. साधारणपणे प्री-वेडिंग शूटसाठी ५० हजार ते ५ लाख रुपये मोजावे लागत आहेत. लग्नासाठी, साखरपुड्यासाठी, हळदीसाठी लागणारा हॉलचा खर्च -१ लाख ते १० लाखापर्यंत येतो. अर्थात हा खर्च तर यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे.

आपल्या प्रतिष्ठेसाठी हे करावे लागणार असल्याने त्यात तडजोड होताना दिसत नाही. जेवणाचा खर्च - ६ लाख ते १४ लाख रुपये येतो. त्यात उपस्थितांची गर्दी किती होते यावरच ते अवलंबून असणार आहे. डेस्टिनेशन वेडिंग - १५ लाख ते ५० लाख, रिसॉर्ट वेडिंग - १८ लाख ते २५ लाख, फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी - २ लाख आणि बस्ता, मानपान - ३ लाख ते १० लाख इतका खर्च साधारण येतो. आता हा खर्च विशेषतः मुलींच्या लोकांना न परवडणारा असतो. मुलांच्याकडील लोकांना तो हवा असतो. आपल्या मुलींच्या कल्याणासाठी मातापिता हा खर्चाचा बोजा पेलत असतात. मुलीच्या उद्याच्या सुखासाठी ही केलेली तडजोड असते. मात्र हा होणारा खर्च नवरीकडच्या मंडळींना कर्जात टाकणारा असतो. जीवनभर जे कमवले ते गमवणे जसे घडते आहे, त्याप्रमाणे काढलेल्या कजाचे हप्ते भविष्यात भरण्यासाठी देखील त्या मातापित्यांचे आयुष्य खर्च होत असते.

ग्रामीण भागात अनेकदा पालक यासाठी शेती विकतात. यातील किती खर्च योग्य ठरेल याचा विचार करण्याची गरज आहे. नव्या आचारसंहितेत १००-२०० लोकांची उपस्थिती असावी असे म्हटले आहे. तसे घडले तर जेवणाचा खर्च, मानापानाचा, हॉलचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकेल. कोरोनाच्या काळात लग्नाची उपस्थितीदेखील ५० लोकांची होती. त्या वाटेने आपला प्रवास झाला तर बरेच काही साध्य होऊ शकेल. त्यामुळे त्यासंदर्भाने गंभीर विचार करण्याची गरज आहे. हुंडा म्हणून रोख रक्कम आणि मागितले जाणारे सोने हे लाखोंच्या घरात असल्याचे सांगण्यात येते आहे.

समाजात भपकेबाज लग्न आणि हुंडापद्धतीमुळे निष्पाप विवाहितांचे हुंडाबळी जाऊ लागलेत. वाढत्या हुंडाबळीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आता समाजातील धुरिणांनी हुंडा पद्धतीला लगाम घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी आचारसंहिता लागू करावी अशी सूचना समोर आली आहे. त्यादृष्टीने त्यांनी जाहीर केलेल्या आचारसंहितेत लग्नात नवरीकडून हुंडा घेऊ नका. मुलामुलीच्या लग्नासाठी कर्ज काढू नका. प्री वेडिंग बंद करा. मुलीच्या नावे मुदत ठेव करा. साखरपुडा, हळदी, लग्न एकाच दिवशी करा. पाच पदार्थाचे मराठमोळे जेवण ठेवावे. लग्न सोहळ्याला १०० ते २०० लोकच बोलवा. लग्नात डिजे, बँडऐवजी पारंपरिक वाद्ये ठेवा, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.


लग्न हा संस्कार आहे त्यामुळे त्याचे स्वरूपही सौज्वळ असावे. आज ही भपकेबाज लग्नं पाहिली की मुलीच्या बापाची झोप उडते. त्यातून त्याच्या जीवाचा घोर वाढतो आहे आणि अशा आत्महत्या पाहिल्या की, त्याची काळजी जीवनभर वाढतच जाते. त्यामुळे या आचारसंहितेच्या निमित्ताने पावले पडतील, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. कोणी तरी एकाने पाऊल टाकले की, भविष्यात त्या मार्गाचा महामार्ग बनल्याशिवाय राहणार नाही. महात्मा फुले यांच्या पहिल्या शाळेत केवळ सहा मुली होत्या. आज देशात मुलींची संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे आज आचारसंहितेची असलेली अरूंद वाट उद्या निश्चित रूंदावेल यात शंका नाही.

# वाईटाचा विनाश करताना बंधुत्वाचा भाव अधिक मोठा व्हावा

जम्मूतील ६५ वर्षीय मुन्शी चाचांचा आवाज आजही बोलताना कापत होता. पहलगाममध्ये घडलेल्या घटनेचा संताप, भारताने दिलेल्या प्रत्युत्तराचा अभिमान आणि युद्धाच्या सावटाखाली जगण्याच्या काळतील धास्ती अशा संमिश्र भावना त्यांच्या प्रत्येक शब्दांतून व्यक्त होत होत्या. भारताने पाकिस्तान केलेल्या हल्ल्याचा काळ सीमेवरील प्रत्येक नागरिकासाठी परीक्षेचा होता. ड्रोनच्या घिरट्या, गोळीबाराचे आवाज, घरांवर आलेले गोळे, हल्ल्यांनी कोसळलेल्या भिंती, ब्लॅकआउट, रात्रीअपरात्रीचे आवाज सगळेच तणाव वाढवणारे होते. पुढच्या क्षणाची शाश्वती देता येत नव्हती. 'सीमेजवळच्या गावात माझे आयुष्य गेले. पण या वेळची परिस्थिती वेगळी होती,' असे मंझूर चाचा सांगत होते. संघषार्चे व्रण कायम असताना मुलांच्या सुखरूप भविष्यासाठी पाकिस्तानला आणखी कठोर धडा शिकवायला हवा, काश्मिरी जनता साथ देईल, असे संतापाने म्हणाले.

नाशिकमध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या अनंतनागच्या डॉ. नादियाने आयुष्यात पहिल्यांदा असा प्रसंग पाहिल्याचे सांगितले. 'मी सध्या कारगिलमध्ये असते. इथे पहलगाम हल्ल्यानंतर गावे रिकामी झाली होती. कारगिलमधील नागरिकांनी अन्नधान्याची तजवीज केली. सीमेनजीक उंचावर राहणारी मंडळी सतर्क होती. एरवी पर्यटनकाळात पहलगामच्या रस्त्यांवर प्रचंड गर्दी असते. आज ती जागा स्मशानशांततेने घेतली होती. गोळ्यांचे आवाज नागरिकांची भीती वाढवत होते.

> "पहलगाम में हमने हमारे भाई खो दिए। हमारी बहनों के घर उजड़ गए। मेहमानों को ईश्वर समान मानना कश्मीर की संस्कृति है, लेकिन हमारे घर आए मेहमानों के साथ जो हादसा हुआ, वह दर्दनाक था। डर के माहौल के बावजूद लोग सड़कों पर उतरे, कैंडल मार्च निकाल कर दुख जताया। हम भारतीय हैं, हमें अपने देश पर गर्व है। भारत ने पाकिस्तान को करारा जवाब दिया, लेकिन पहलगाम प्रकरण के बाद का एक महीना हमारे लिए परीक्षा की घड़ी था। ड्रोन, गोलीबारी, बम धमाकों की आवाज से बच्चों में डर था। वे सो नहीं पाए। जिंदा रहने की उम्मीद नहीं बंध रही थी। शुक्र है, आज मैं आपसे बात कर रहा हूं..."




मी मूळची अनंतनागची. तिथेही वातावरणात प्रचंड तणाव होता. गेल्या दोन-अडीच दशकांतील हा सर्वांत मोठा संघर्ष मी पाहिला. आता पुन्हा सारे पूर्ववत होतेय, याचे समाधान आहे,' असे ती म्हणाली.

सीमेवरील तणावाचा सामान्य काश्मिरी नागरिक आणि मुलांच्या आयुष्यावर दीर्घकाळ होणारा परिणाम तेथील प्रत्येक नागरिकाशी बोलताना जाणवत होता. पहलगाममधील हल्ल्याला एक महिना पूर्ण होत असताना वातावरण काहीसे निवळू लागले असले तरी काश्मिरी नागरिकांना या महिन्याने दिलेल्या वेदना, जखमा आणि संतापाची भावना आजही ठसठसते आहे. पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी माफी मागितली होती. 'येथील मुख्यमंत्री, पर्यटनमंत्री म्हणून मी यजमान होतो. येथील निसगार्चा आनंद घेऊन सगळे सुखरूप परत जावेत, ही माझी जबाबदारी होती. पण तसे घडले नाही. मी कोणत्या तोंडाने माफी मागू,' असा प्रश्न करत ओमर यांनी काश्मिरी जनतेच्या मनातील भाव मांडले. आज एक महिन्यानंतर हाऊसबोट मालक, सामाजिक कार्यकर्ते आणि 'वॉटर ॲम्ब्युलन्स' सेवाही देणाऱ्या तारिक यांच्याशी बोलताना त्यांनीही ही खंत बोलून दाखवली.

'मागचा एक महिना आम्ही तणावात आहोत. पहलगाममध्ये घडलेली घटना अत्यंत वेदनादायी होती. आमच्या पाहुण्यांच्या सुरक्षेची जबाबदारीही आम्ही घेऊ शकलो नाही. पाकिस्तानकडून कायमच काश्मीर अस्थिर करण्याचा प्रयत्न होतो. मात्र काश्मिरातील नागरिक हे शांततेचे पुरस्कर्ते आहेत. अतिथी देवो भव या विचारांचे आहेत. त्यामुळे आमच्या पाहुण्यांवर झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात भारताने कठोर कारवाई करायला हवीच होती. त्यामुळे 'ऑपरेशन सिंदूर'चे प्रत्येक नागरिक समर्थन करतो, आमची भूमिका आणखी कठोर कारवाईची आहे. भारताने दहशतवादाच्या बाबतीत झिरो टॉलरन्स धोरणच अवलंबले पाहिजे,' असे तारिक म्हणाले.

काश्मीरमधील अर्थव्यवस्था आणि सर्वसामान्यांची कुटुंबे ही पर्यटन व्यवस्थेवर चालतात. मात्र पर्यटनाचा कालावधी सुरू होत असतानाच, एप्रिलमध्ये पहलगाममधील घटना घडली. पर्यटन काळासाठी येथील नागरिकांनी गुंतवणूक केली होती. मात्र पहलगामनंतर धडाधड बुकिंग कॅन्सल होऊ लागले. हाती पैसा लागणे सोडाच, पण गुंतवलेली जमापुंजी मिळण्याची शाश्वती उरली नाही. त्यामुळे आज येथील सामान्य नागरिक अत्यंत अडचणीत आहेत. युद्ध आणि परीक्षेच्या काळात काश्मिरी जनतेने अत्यंत संयमाने साथ दिली. रस्त्यावर उतरून दहशतवाद झुगारला. आता सरकारने येथील नागरिकांच्या पाठीशी उभे राहावे, अशी अपेक्षा येथील मंडळींनी बोलताना व्यक्त केली. 'पाकिस्तानचे काश्मीरला एकटे पाडण्याचे डाव आहेत. येथील प्रत्येक घरातून दहशतवादी घडावा म्हणून पाकिस्तान अशांतता माजवण्याच्या प्रयत्नात आहे. पण आम्ही या भारताचे नागरिक आहोत आणि एकजूट ही आपली ताकद आहे. शत्रूचे मनसुबे हाणून पाडण्यासाठी आता येथील जनतेला सरकारने साथ द्यावी,' अशी मागणी तारिक यांनी केली.

गेले ५५ वर्षे श्रीनगरमध्ये हाऊसबोटचा व्यवसाय करणाऱ्या राशिद यांनीही देशातील नागरिकांना सुरक्षेबाबत आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला. 'काश्मिरी जनतेचा बंधुत्वाच्या भावनेवर विश्वास आहे. पाकिस्तानला काश्मिरी जनता नव्हे, तर काश्मीर हवे आहे. मात्र, काश्मीर आणि नागरिक भारताचेच आहेत. त्यामुळे नागरिकांनी निःशंक होऊन काश्मीरला यावे. वाईटाला आपण मिळून ठेचू आणि माणुसकीची बीजे पेरू,' असा शांतता, बंधुत्वाचा भाव व्यक्त करून भारतीयांना काश्मिरी पाहुणचार पुन्हा अनुभवण्याचे आवाहन राशिद यांनी केले. नागरिक आता येऊ लागल्याने आशेचे सुचिन्ह असल्याचे ते म्हणाले. 'स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया'मध्ये क्रीडा अधिकारी असलेल्या मूळ कोलकात्यातील बसंतकुमार यांनीही अशीच भावना मांडली. 'मी एप्रिलमध्ये काश्मिरात येण्याचे नियोजन केले होते. पण तेव्हा येता आले नाही. मात्र आता माझ्या मुलाबाळांसह इथे आलो आहे. गुलमर्ग, पहलगाम फिरलो. काश्मिरी मातीचा गोडवा अनुभवतोय, संकटकाळात या मंडळींसोबत आपण उभे राहायला हवे. अतिरंजित माहितीवर विश्वास ठेवू नका. बॅगा भरा आणि काश्मिरात या,' असे ते म्हणाले.

भारत-पाकिस्तान संघर्षाचा मोठा फटका पूँच, राजौरीला बसला. येथील नागरिकांनी घरे, आप्त गमावले. हल्ल्यात काश्मिरातील १७ जण ठार झाले. घरातल्या लहान मुलांनी जीव गमावला. मात्र, या नागरिकांकडे सरकारी पातळीवर दुर्लक्ष झाल्याची खंत पूँचमधील नागरिकांच्या वतीने डॉ. एकाग्रचित सिंग यांनी मांडली. 'हल्ल्यामध्ये लहान मुलांसह १७ नागरिक गेले. त्यांची घरे कोण उभारणार? येथील नागरिकांचा आधार कोण होणार,' असा प्रश्न उद्विग्नतेतून त्यांनी उपस्थित केला.

जम्मू-काश्मीरमधील कुंजवानी शाळेत शिकणाऱ्या दहावीतील विद्यार्थिनीने मांडलेली भावना परिस्थितीकडे पाहण्याचा मुलांचा दृष्टिकोन मांडणारी आहे. ह्यमाज्या मनात भीती होती, ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी मला घाबरवले, तरीही माझ्या मनात एकच खात्री होती, भारतीय सैन्य कधीही थांबणार नाही, आकाशात ड्रोन होते, मला वाटले की मी मरणार आहे, मग आला आशेचा किरण, एस ४०० हे त्याचे नाव, शाळा बंद झाल्या, दुकाने बंद झाली, युद्धबंदी आली, वाटले आणीबाणीची स्थिती संपली, पण शत्रू कधीच थांबणार नाही, हेच खरे. देवा! मला फक्त एकदा सांग, खरे युद्ध कधी थांबेल?' परीशाने मांडलेली 'खऱ्या' युद्धस्थितीची चिंता विचार करायला लावणारी आहे.

वाईटाचा विनाश करताना बंधुत्वाचा भाव अधिक मोठा व्हावा, ही भावना काश्मिरी नागरिक मांडत आहेत. येथील तरुण दहशतवादाच्याविरोधातच आहेत, हे आवर्जून सांगत आहेत. सरकारी पातळीवर अधिक संवेदनशीलतेची त्यांना आस आहे आणि देशवासींच्या साथीची आस. देशात रुजलेला एकी, चांगुलपणाचा, माणुसकीचा भाव दहशतवादावर वरचढ ठरत राहो, ही त्यांची भावना आहे.

## अर्ध्यावरती डाव सोडला




अमेरिकेतील सरकारी खर्चात दोन हजार अब्ज डॉलरने कपात करण्याचे उद्दिष्ट दहा टक्केही पूर्ण झालेले नसताना उद्योगपती एलन मस्क सरकारी पदावरून पायउतार झाले आहेत. लक्ष्यपूर्तीमध्ये आलेले अपयश, ओढवून घेतलेला जनरोष आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांशी वाद अशी अनेक कारणे त्यामागे आहेत. अमेरिकेला पुन्हा 'ग्रेट' बनविण्याची घोषणा देऊन सत्तेवर आलेले ट्रम्प यांच्या स्वप्नपूर्तीमध्ये मस्क हे त्यांचे निकटचे सहकारी होते.

बेफाट घोषणा आणि लहरीपणा, याबाबतीत ट्रम्प आणि मस्क यांचे ३६ गुण जुळत असल्याने त्यांची जोडी जमणार, असे वाटत असतानाच १३० दिवसांतच एलन मस्क यांनी सरकारला 'गुड बाय' केले आहे. सत्तेवर येताच ट्रम्प यांनी 'डिपार्टमेंट ऑफ गव्हर्न्मेंट एफिशिअन्सी' खात्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवली होती. अमेरिकी सरकारमध्ये अनेक वायफळ खर्च सुरू असून, त्यात दोन हजार अब्ज डॉलरची बचत करण्याची राणा भीमदेवी घोषणा ट्रम्प आणि मस्क यांनी केली होती. मात्र, प्रत्यक्ष कामाला सुरुवात करताच या घोषणेतील अनेक विसंगती सर्वांच्याच लक्षात आल्या. देशासह जगभरात अनेक कामांना देण्यात येणाऱ्या निधीला या द्वयीने कात्री लावली; मात्र खर्च कमी करण्याच्या सपाट्यात अनेक विभागांतील कर्मचारीकपातीमुळे मस्क हे नागरिकांच्या रोषास पात्र ठरले. त्यांच्या विरोधात ठिकठिकाणी निदर्शने झाली आणि त्यांच्या 'टेस्ला' कंपनीचे समभागही घसरले.

दोन हजार अब्ज डॉलर बचत आवाक्यात नसल्याचे लक्षात येताच यथावकाश त्यांनी हे लक्ष्य दीडशे अब्ज डॉलरपर्यंत खाली आणले होते. त्यातच ट्रम्प आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी मस्क यांचे वेगवेगळ्या कारणांवरून मतभेद सुरू झाले. परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्याशी मस्क यांचे वाद झडले. त्याप्रमाणेच संयुक्त अरब अमिरातीमध्ये 'एआय डेटा सेंटर' उभारण्याच्या मस्क यांच्या प्रकल्पास ट्रम्प यांच्याकडूनच सुरुंग लागला. ट्रम्प यांनी आणलेल्या वन बिग ब्युटिफूल बिल या विधेयकात करकपातीला दहा वर्षांची मुदतवाढ आणि संरक्षण खर्च वाढविण्याच्या तरतुदी या त्यांच्या खात्याच्या उद्दिष्टांशी विसंगत असल्याने मस्क यांनी त्याविरोधात मुलाखतीही दिल्या.

गेल्या काही दिवसांत त्यांना 'व्हाइट हाउस'च्या काही कार्यक्रमांपासून दूर ठेवण्यात आल्याचीही चर्चा आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारी पद सोडून 'टेस्ला' आणि 'स्पेसएक्स' या कंपन्यांच्या कारभारावर लक्ष केंद्रित करण्याचे मस्क यांनी ठरविले आहे. आता त्यांच्या खात्याचे आणि बचतीच्या स्वप्नांचे पुढे काय होणार, हे मात्र अधांतरी आहे.



# छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

**सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :**



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची समस्या!

**चेहऱ्यावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय -** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेहऱ्याला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये ८६.३% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेहऱ्यावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य-**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

**हृदयरोग**

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

**कर्करोग**

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

**स्ट्रोक**

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

**फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.**

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

**महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?**

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.

# उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल

**आजकाल** प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये.

वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे.

नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.



# तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...

**ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...**



**सर्वप्रथम** आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

**व्हिटॅमिन सी :** हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्रं, लिंबू आणि मोसंबी

**व्हिटॅमिन ए :** याचे मुख्य स्त्रोत आहे- पपई, संत्रं, एग यॉर्क

**व्हिटॅमिन बी :** हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

**व्हिटॅमिन इ :** हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

# पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय



पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

**कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात**

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो.

लागणारे साहित्य

▮ कोमट पाणी कोरफडचा गर मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळा नंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.

# पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त

**आपल्या** दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो.

फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्कात्सी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात.



भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.के.के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात.

कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

# जांभूळ खा आणि तंदुरुस्त राहा

▮ जांभळामध्ये असलेल्या मधुमेहविरोधी गुणधर्मामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. जांभळामुळे रक्तातील स्टार्च आणि साखरेचं रूपांतर ऊर्जेमध्ये होतं.

▮ जांभळाच्या फळासोबतच जांभळाच्या बियांची पावडर, जांभळाच्या झाडाची साले, जांभळाचा रस याचाही मधुमेहाच्या उपचारात चांगला उपयोग होतो.

▮ जांभळाच्या झाडाच्या सालाची आणि बियांची पावडर पोटाच्या विकारावर गुणकारी असते. डायरिया, अपचन, जुलाब यासारख्या आजारात ती फायदेशीर ठरते.

▮ जांभूळ नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करते. जांभळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोह म्हणजेच आर्यन असतं. त्यामुळे जांभूळ खाल्ल्यानेही रक्तातील हिमोग्लोबीन वाढतं.

▮ जांभळात मोठ्या प्रमाणात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वं असतं. तसेच खनिजंही असतात त्याचा उपयोग डोळ्यांचं आणि त्वचेचं आरोग्य सुदृढ ठेवण्यास होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

▮ जांभूळ थंड फळ असल्यानं पोटातील आग आणि अपचन यावर उपयोगी असतं.

▮ जांभूळ खाल्ल्यानं दात आणि हिरड्या मजबूत होतात. तसेच दात आणि हिरड्यात संसर्ग होत नाही.

▮ जांभळाच्या बियांची पावडर गायीच्या दुधात मिक्स करून हा लेप चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरच्या मुरुम, पुटकुळ्या निघून जातात.

▮ ज्यांना भूक लागण्याची समस्या आहे त्यांनी जांभळाचं व्हिनेगर/सिरप दिवसातून दोन ते तीन वेळेस पाण्यासोबत समप्रमाणात घेतल्यास भूक वाढते.



▮ जांभळाच्या ज्यूसचा उपयोग अशक्तपणा, ॲनेमिया यावरही होतो. तसेच जांभळाच्या ज्यूसच्या नियमित सेवनानं स्मरणशक्ती वाढते.

# लिव्हर (यकृत)साठी घरगुती उपाय गुणकारी

**स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.**



▮ आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.

▮ जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.

▮ जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.

▮ जवसाच्या बियांमध्ये साइटोकॉन्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.

▮ बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात.

# ‘एक राज्य, एक नोंदणी’योजनेपुढे अडथळे

## योजनेच्या कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेला खीळ बसणार

**मुंबई :** गेल्या महिन्यात सुरू झालेल्या ‘एक जिल्हा, एक नोंदणी’ या योजनेच्या यशामुळे राज्य सरकार आता ‘एक राज्य, एक नोंदणी’ ही महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित करण्याच्या तयारीत आहे. मात्र, या योजनेच्या अंमलबजावणीत अडथळा ठरू शकणाऱ्या १३ प्रमुख अडचणींमुळे महसूल विभाग चिंतेत आहे.

‘एक राज्य, एक नोंदणी’ ही योजना प्रत्येक विभागासाठी निश्चित करण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या यादीत महत्त्वाकांक्षी योजनेच्या रूपात समाविष्ट आहे. ‘एक जिल्हा, एक नोंदणी’ योजना १ मे रोजी सुरू झाल्यानंतर एक महिन्यात १५ हजार कागदपत्रांची नोंदणी राज्यभरात विविध जिल्ह्यांत करण्यात आली. यामुळे या पुढील टप्प्याला गती मिळाली आहे.

### काय आहेत अडचणी?

- कागदपत्रांची नोंदणी करताना बनावट व्यक्तीचा वापर
- मृत व्यक्तीला जिवंत दाखवून नोंदणी करणे
- डोंगराळ भागातील प्रकल्पांमधून जमीन विक्रीदरम्यान शेतकऱ्यांची फसवणूक
- संयुक्त कुटुंबातील मालमत्ताधारकांमध्ये एकानेच विक्रीपत्र नोंदवणे
- महारेरामध्ये नोंदणी नसलेल्या प्रकल्पांचे प्लॉट/फ्लॅट विक्रीपत्र नोंदवणे
- अशिक्षित विक्रेत्यांचा गैरफायदा घेणे
- सरकारकडून निश्चित करण्यात आलेल्या दरांपेक्षा कमी मुद्रांक शुल्क भरणे




‘एक जिल्हा, एक नोंदणी’ अंतर्गत, नागरिक आपल्या जिल्ह्यातील कोणत्याही नोंदणी कार्यालयातून मालमत्तेची नोंदणी करू शकतात. योजनेचा पुढील टप्पा ‘एक राज्य, एक नोंदणी’ सुरू झाल्यानंतर राज्यातील कोणत्याही नोंदणी कार्यालयातून मालमत्तेची नोंदणी करता येणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी योजनेत संभाव्य अडचणींची यादी तयार केली आहे. त्या अडथळ्यांमध्ये काही बाबींचा समावेश आहे. या सर्व समस्यांचा विचार करत महसूल विभागाने आपल्या अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करत कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

फसवणूक, शेतकरी व नागरिकांची आर्थिक लूट तसेच मुद्रांक शुल्क कमी आकारण्याचे प्रकार यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. नोंदणी कायद्याच्या कलम ८२ आणि ८३ अंतर्गत कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. या कलमांनुसार, खोट्या व्यक्तीमार्फत नोंदणी करून दिल्यास किंवा आदिवासी व्यक्तीच्या जमिनीची राज्य सरकारची परवानगी न घेता नोंदणी केल्यास, उपनोंदणी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल होऊ शकतो.

सूत्रांच्या माहितीनुसार, याआधी अनेक बनावट नोंदण्या झाल्या असल्या तरी या कलमांनुसार फारशी कारवाई झाली नव्हती. प्रत्येक पंधरवड्याला वर्ग १चे जिल्हा संयुक्त निबंधक व मुद्रांक संकलक यांना नोंदणी कार्यालयांची पाहणी करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंग कारवाई होईल, असा इशारा महसूल विभागाने दिला आहे.

---

# ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्या

## ‘नवी मुंबई महापालिके’चे नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारतींचे २०२४-२५ सालासाठी सर्वेक्षण करण्यात आले असून, यामध्ये एकूण ५२७ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ३० वर्षांपेक्षा जुन्या सर्व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे अनिवार्य असल्याचे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेने केले आहे.

ज्या इमारतींना वापरात येऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा सर्व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी महापालिकेने मान्यता दिलेल्या बांधकाम अभियंता किंवा संरचना अभियंत्याकडून करून घ्यावे लागणार आहे. ही कालगणना भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा अंशतः) मिळालेल्या दिवसापासून केली जाणार आहे.

परीक्षण करणाऱ्या अभियंत्याने सुचवलेल्या दुरुस्तीची कामे पूर्ण करून,



इमारत सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित इमारत मालक, संस्था किंवा भोगवटादार यांच्यावर २५,००० रुपये किंवा वार्षिक मालमत्ता करापेक्षा जास्त रकमेचा दंड ठोठावण्यात येणार आहे.

महापालिकेने अधिकृत स्ट्रक्चरल इंजिनिअरची यादी संकेतस्थळावर www. nmmc.gov.in उपलब्ध करून दिली आहे. सर्व संबंधितांनी त्यांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट ३० सप्टेंबर पूर्वी पूर्ण करून अहवाल संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त, विभाग अधिकारी किंवा सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडे सादर करावा, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

> “धोकादायक झालेल्या इमारतींचा, घरांचा वापर करणे जिकरीचे आहे. त्यामुळे जीवित आणि वित्तहानी होऊ शकते. म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा, घराचा रहिवास, वापर तत्काळ थांबविण्यात यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा दुर्दैवी अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील, याची नोंद घेण्यात यावी, असे सूचित करण्यात येत आहे.”
>
> **-डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

---

# कासा-सायवन राज्यमार्गावर अवजड वाहनांची सर्रास वाहतूक

**डहाणू :** कासा -सायवन राज्यमार्गावर सध्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. या कामामुळे रस्ता खोदण्यात आला असून, पावसामुळे माती भरावाच्या ठिकाणी चिखल झाला आहे. या परिस्थितीत काही ठिकाणी मोठे खड्डे आणि खोल भाग तयार झाले आहेत. तरीदेखील या रस्त्याचा आडमार्ग म्हणून अवजड वाहनांची चोरपणे वाहतूक सुरू आहे. ठेकेदारी कंपनीने स्थानिक पोलीस ठाणे व आरटीओ विभाग पालघर यांना याबाबत पत्रव्यवहार करून या वाहतुकीस बंदी घालण्याची मागणी केली आहे. मात्र, पत्रव्यवहार करूनही काही दलालांच्या मदतीने अवजड वाहने सर्रास या मार्गाने धावत आहेत. त्यामुळे रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण होत असून, काही अवजड वाहने चिखलात फसून किंवा घाटाच्या नागमोडी वळणावर बंद पडून उभी राहत आहेत.

या रस्त्यावरून रुग्णवाहिका, शाळेची वाहने, सरकारी अधिकारी, तसेच दुचाकी व छोट्या वाहनधारकांचा मोठा वावर असतो. पण, मोठ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. यापूर्वीही या मार्गावर अपघातांच्या घटना घडल्या आहेत. या संदर्भात स्थानिक ग्रामस्थ, सरपंच, व वाहनचालकांनी अनेकदा पोलिस आणि आरटीओ पालघर यांच्याकडे तक्रारी करूनही कोणतीच ठोस कारवाई झाली नसल्याने



**सूचनाफलकाचा अभाव :** रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी कुठेही सूचनाफलक लावण्यात आले नसल्याने वाहनचालकांना अचानक खोदलेल्या रस्त्याचा अंदाज न येता अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. याबाबत ठेकेदारी कंपनीने तात्काळ सुरक्षेच्या दृष्टीने सूचनाफलक लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अशा प्रकारे बेकायदेशीर अवजड वाहतुकीवर तात्काळ बंदी घालून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ, प्रवासी व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. शासनाचा कर चुकवण्यासाठी ही वाहतूक होत असल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला असून, आरटीओ पालघर विभागावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

---

# अशोक धोडी हत्याप्रकरणात पोलिसांना मोठे यश

**डहाणू :** शिवसेना (शिंदे गट) चे डहाणू विधानसभा समन्वयक आणि माथाडी सेनेचे तालुका अध्यक्ष अशोक रमण धोडी यांच्या थरारक हत्येप्रकरणी तब्बल सहा महिन्यांनंतर मुख्य आरोपी अविनाश धोडी याला अखेर पालघर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरून गेला होता. आरोपी सहा महिने फरार राहिल्यानंतर पोलिसांनी केलेली ही कारवाई जिल्ह्यात मोठ्या चर्चेचा विषय ठरत आहे. २० जानेवारी २०२५ रोजी अशोक धोडी मुंबईहून डहाणूकडे निघाले होते. मात्र, रात्री घरी परतले नाहीत. कुटुंबीयांनी त्यांचा अपहरण आणि घातपात झाल्याचा संशय व्यक्त करताच पोलिसांनी तपास सुरू केला. प्राथमिक तपासातच संशयाची सुई त्यांच्या सख्ख्या भावाकडे वळली. चौकशीसाठी बोलावल्यावर अविनाश धोडी पोलिसांपासून पळून गेला.

गुजरातमधील भिलाड परिसरात सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू ठेवत पोलिसांनी एका ब्रेझा कारचा माग काढत सरिगाममधील बंद खदानीत शोधमोहीम राबवली. अखेर ३१ जानेवारी रोजी गाडी बाहेर काढल्यानंतर तिच्या डिकीत अशोक धोडी यांचा सडलेल्या अवस्थेतील मृतदेह सापडला. त्यांच्या हातपाय दोर्यांनी बांधलेले आणि चेर्हयावर अमानुष मारहाण केल्याचे निशाण होते. या प्रकरणाचा तपास बराच काळ थंडावल्याचा आरोप कुटुंबीय आणि ग्रामस्थांकडून करण्यात आला. २९ मे २०२५ रोजी डहाणू न्यायालयाने अविनाश धोडीसह इतर दोन आरोपींविरुद्ध गुन्हेगारी वॉरंट जारी करून २१ जूनपर्यंत हजर करण्याचे आदेश दिले होते. मात्र आरोपी फरारच राहिले. पोलिसांवर मिलीभगतीचे तसेच आरोपी आणि पोलिसांमधील आर्थिक संबंध असल्याचे आरोपही करण्यात आले.



### पुढील टप्पा आणि उर्वरित आरोपींचा शोध

अविनाश धोडीच्या अटकेनंतर आता उर्वरित फरार आरोपी मनोज रजपूत व आशिष पटेल यांचा शोध सुरू असून, तपासात आणखी धक्कादायक माहिती उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लवकरच या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रिया सुरू होणार असून, आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी कुटुंबीय आणि ग्रामस्थांकडून केली जात आहे.

कुटुंबीयांनी अविनाश धोडी हा स्थानिक दारूमाफिया असून पोलिसांशी आर्थिक व्यवहार करत असल्याचा गंभीर आरोप केला. ग्रामस्थांनीही निषेध करत पोलिसांवर ह्यमूक संमतीह्लचा ठपका ठेवला. या घटनेनंतर आमदार विनोद निकोले यांच्या नेतृत्वात डहाणू पोलीस उपविभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी आठ दिवसांत आरोपीला अटक करण्याचे पोलिसांनी आश्वासन दिले होते, मात्र महिनाभर काहीही घडले नाही.सहा महिने पोलिसांना हुलकावणी देत असलेल्या अविनाश धोडीला अखेर ७ जून रोजी रात्री पालघर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सावंतदेसाई, उपनिरीक्षक व्हटकर, पोलीस हवालदार गजानन राठोड, भगवान राठोड यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली.

पालघरचे नव्याने पदभार स्वीकारलेले पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखालील ही पहिली मोठी कारवाई मानली जात आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले, ह्लपालघर जिल्ह्यात कोणत्याही गुन्हेगाराला पाठीशी घातले जाणार नाही. गुन्हेगार कितीही मोठा असो, कारवाई अटळ आहे.ह्व

---

# शहरात दिव्यांगांचे फेर सर्वेक्षण करण्याची बच्चू कडू यांची मागणी

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात दिव्यांगांना अनेक समस्या असून त्यांच्या मागण्या मान्य होत नसल्याच्या तक्रारी आहेत.यावेळी माजी आमदार बच्चू कडू यांनी महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांची गुरुवारी दुपारी भेट घेतली. यावेळी मिरा-भाईंदर शहरातील दिव्यांगांचे केलेले सर्वेक्षण हे चुकीचे असून दिव्यांगांचे फेर सर्वेक्षण करण्याची मागणी बच्चू कडू यांनी केली आहे. तसेच दिव्यांगांचे अचूक सर्वेक्षण करण्यासाठी अकोला पॅटर्न राबवण्याची मागणी त्यांनी केली. यावेळी मिरा- भाईंदर शहरातील दिव्यांगासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

मिरा-भाईंदर महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार, शहरात सध्या २२२४ दिव्यांग आहेत. महापालिकेने दिव्यांगांचे सर्वेक्षण ऑनलाइन पद्धतीने केले आहे. महापालिकेने केलेले सर्वेक्षण हे चुकीचे असून शहरात यापेक्षाही जास्त दिव्यांग असू शकतात असे कडू यांनी सांगितले. त्यामुळे महापालिकेने फेरसर्वेक्षण करावे व त्यासाठी अकोला पॅटर्न राबवण्यात यावा. अकोला पॅटर्नमध्ये सर्वेक्षणासाठी आशा सेविकांची मदत घेण्यात आली होती.

या अकोला पॅटर्नचे देशभरात कौतुक झाले आहे, अशी महिती बच्चू कडू यांनी दिली. यावेळी दिव्यांगांच्या मागण्या आयुक्तांपुढे मांडण्यात आल्या. तसेच दिव्यांगांना देण्यात येत असलेले स्टॉल मोठे द्यावेत तसेच त्याची उंची वाढवून देणे, दिव्यांगांना घरे देण्यासाठी सरकारी योजनांची अंमलबजावणी करणे, बाजारामध्ये दिव्यांगांना पाच टक्के आरक्षण देणे, दिव्यांगासाठी दिव्यांग भवन सुरू करणे आदी मागण्या यावेळी आयुक्तांनी मान्य केल्या आहेत. तसेच महापालिकेकडून सध्या केवळ ५० टक्क्यांहून अधिक दिव्यांगत्व असलेल्यांनाच दिव्यांग योजनांचा लाभ देण्यात येतो. परंतु सरकारने ४० टक्के व त्याहून अधिक दिव्यांगांनाही सर्व लाभ देणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार यापुढे ४० टक्के दिव्यांगत्व असलेल्यांनाही सर्व लाभ देण्याचे आयुक्तांनी मान्य केले.




आशा सेविका या शासनाच्या आरोग्य विभागाच्या योजनेसाठी घरो घरी जाऊन सर्वेक्षण करतात. त्यामुळे आशा सेविका यांना पूर्ण परिसराची माहिती असते. या सर्वेक्षणासाठी आशा सेविकांची मदत घेतल्यास शहरातील दिव्यांगांची अचूक गणना होईल.

तसेच दिव्यांगांना देण्यात आलेल्या स्टॉलला महापालिका ८ हजार रुपये भुईभाडे घेते. हे भुईभाडे जास्त आहे. शासनाच्या नियमानुसार दिव्यांगांकडून केवळ १२०० रुपयेच भुईभाडे घ्यायला हवे, असे कडू यांनी सांगितले असता आयुक्तांनी शासनाच्या नियमानुसार भुईभाडे घेतले जाईल असे सांगितले.

महापालिकेकडून दिव्यांगांना स्टॉल वाटपासंदर्भात होत असलेल्या विलंबाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. महापालिकेकडून दिव्यांगांना स्टॉल परवाने दिले जात नसल्याने काही दिव्यांगांनी अनधिकृत स्टॉल उभारले आहेत. त्यांचा सहानभूतीपूर्वक विचार करून त्यांना परवाने तातडीने द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर अनधिकृत स्टॉलचे फेर सर्वेक्षण करून दोन दिवसांत परवाने दिले जातील, असे आश्वासन आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी दिले.

---

# बनावट आदेशाच्या आधारे फसवणूक

**मुंबई :** उच्च न्यायालयाच्या बनावट आदेशाच्या आधारे वृद्ध महिलेची फसवणूक करणा[illegible]या वकिलाला सत्र न्यायालयाने मोठा दणका दिला. २.५७ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या विनयकुमार खातूला जामीन मंजूर करण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. वकिलाची पूर्वीर्ची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि गंभीर आरोपांमुळे तो जामिनासाठी अपात्र आहे, असे निरीक्षण नोंदवत अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. जी. रघुवंशी यांनी वकिल विनयकुमार खातूला दिलासा देण्यास नकार दिला.




खातूने यापूर्वी दिल्ली आणि केरळमध्ये भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी असल्याची बनावट ओळख निर्माण केली होती. त्या ओळखीच्या आधारे फसवणूक केल्याबद्दल त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी खातूवर याआधीच दोन गुन्हे दाखल आहेत.

---

# न्यायालयाने दिले सुटकेचे आदेश

## फसवणूक प्रकरणात महिलेला मानवतेच्या आधारे जामीन

**मुंबई :** २.४५ कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात अटक केलेल्या महिलेला उच्च न्यायालयाने मानवतेच्या आधारावर जामीन मंजूर केला. अर्जदार महिलेवर दोन अल्पवयीन मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी असल्याचे विचारात घेत न्यायालयाने आरोपी नीलम नरोदिया हिला जामीन मंजूर केला.

नीलम नरोदियाविरुद्ध २५ फेब्रुवारी रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. तिचा पती आणि इतर दोघांवरही बनावट कागदपत्रे बनवून विविध तक्रारदारांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा आरोप आहे. नरोदियाला ४ एप्रिल रोजी अटक करण्यात आली होती आणि ११ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी झाली होती. त्यानंतर तिला न्यायालयीन कोठडी सुनावली गेली होती. ७ मे रोजी नाशिक सत्र न्यायालयाने तिचा जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर तिने उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली.




आरोपीच्या वतीने [illegible]ड. जयदत्त खोचे यांनी युक्तिवाद केला. या प्रकरणात तिला कोठडी ठेवणे चुकीचे आहे. तिला तीन वर्षे आणि आठ वर्षे वय असलेली दोन लहान मुले आहेत.

तिला अटक करून मुलांना त्यांच्या आईच्या प्रेमापासून वंचित ठेवण्यात आले आहे, याकडे [illegible]ड. खोचे यांनी लक्ष वेधले. महिलेच्या जामीन अजार्ला सरकारी वकिलांनी तीव्र विरोध केला. फसवणुकीच्या एकूण रकमेपैकी केवळ ९५ लाख रुपये पीडितांना परत मिळाले असल्याचे अतिरिक्त सरकारी वकील मेघा एस. बाजोरिया यांनी न्यायालयाला सांगितले.

### मुलांचा सांभाळ करण्याच्या हेतूने जामीन मंजूर

दोन्ही युक्तिवाद ऐकल्यानंतर न्या. अश्विनी भोबे यांच्या सुट्टीकालीन एकलपीठाने अर्जदार आरोपी महिलेला दोन्ही अल्पवयीन मुलांचा सांभाळ करण्याच्या हेतूने मानवतेच्या आधारावर जामीन अर्ज मंजूर केला. जामीन मंजूर झाल्यास अर्जदार महिला न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातून पळून जाण्याची किंवा फरार होण्याची शक्यता सरकारी पक्षाने वर्तवलेली नाही, असेही एकलपीठाने नमूद केले. याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने आरोपी महिलेला ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर तुरुंगातून सोडून देण्याचे निर्देश दिले.

---

# पोलीस ठाण्याच्या हद्दीत बनावट नोटा बनवणाऱ्या आरोपींना अटक

**भाईंदर :** काशिगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीत भारतीय चलनाच्या ५०० रुपये दराच्या बनावट नोटा बनवणारे व त्या नोटा चलनात वितरीत करणार्या आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून १ लाख ८ रुपये किंमतीच्या एकूण २१६ बनावट नोटा हस्तगत करण्यात काशिगांव पोलिसांना यश मिळाले आहे. मिरारोड येथे दोन व्यक्ती या भारतीय चलनातील ५०० रुपये दराच्या बनावट नोटा कोणत्यातरी अज्ञात ठिकाणी छापून त्या चलनात आणण्याकरीता येणार असल्याची खात्रीदायक माहिती काशिगांव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अभिजित लांडे यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून प्राप्त माहितीच्या आधारे सुपर्ना रामक्रिष्णा मन्ना आणि सुयार्देब गोपीनाथ गायेन अशा दोन जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ५०० रुपये दराच्या २६ बनावट नोटा मिळून आल्याने त्यांच्या विरुद्ध काशीगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपींना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली. त्यांच्याकडे केलेल्या तपासात त्यांनी सदर नोटा त्यांच्या राहत्या घरात छापल्या असल्याचे सांगितले. त्यानुसार रुमची झडती घेतल्यावर रुममध्ये ५०० रुपये दराच्या भारतीय चलनाच्या एकुण १९० बनावट नोटा मिळून आल्या. तसेच बनावट नोटा छापण्या करता वापरलेले कलर झेरॉक्स प्रिंटर, ए-४ साईझचे प्लेन कागदी रिम, एक चार इंचाचा चाकू, स्कूल पॅड आणि प्लास्टीकची फुटपट्टी इत्यादी साहित्य त्यांच्या घरातून जप्त करण्यात आले आहे.

पैशांची देवाण-घेवाण करतांना बनावट चलनी नोटाद्वारे आपली फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. बनावट चलन कोणी इसम वितरणात आणत असल्यास त्या बाबतची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला देण्यात यावी, असे आवाहन मिरा -भाईंदर, वसई -विरारमधील नागरिकांना पोलिसांच्या मार्फत करण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही परिमंडळ १ चे पोलीस उप आयुक्त प्रकाश गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विजय मराठे, काशिगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड, पोलीस उपनिरीक्षक अभिजीत लांडे , गुन्हे प्रकटीकरण शाखेचे राणा परदेशी तसेच अंमलदार आणि पोलीस हवालदार प्रताप पांचुदे, पोलीस शिपाई विक्रांत खंदारे, उमंग चौधरी, किरण विरकर, टोबर, रवींद्र सोनावणे, नामदेव देवकाते यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com